५९ ११

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत वन विभागामार्फत घेण्यात येणाऱ्या कामांना मान्यता देण्याकरिता गठीत करण्यात आलेल्या समितीस मुदतवाढ देण्याबाबत

महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग (रोहयो प्रभाग)
शासन निर्णय क्र. मग्रारो-२०१६/प्र.क्र.१०२ (भाग-२)/मग्रारो-१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२
दिनांक :- २१ मे, २०२०

**वाचा :-**

| | | |
|---|---|---|
| १ | शासन परिपत्रक क्र. मग्रारोहयो - २०११ / प्र. क्र. ८४ / रोहयो -१, | दिनांक ०१ नोव्हेंबर,२०११ |
| २ | शासन निर्णय क्र. मग्रारो - २०११ / प्र. क्र. ८० / रोहयो -१, | दिनांक ०९ डिसेंबर, २०११ |
| ३ | शासन निर्णय क्र. मग्रारो - २०११ / प्र. क्र. १३० / रोहयो - १० अ, | दिनांक २८ डिसेंबर, २०११ |
| ४ | शासन निर्णय क्र. मग्रारो - २०१३ / प्र. क्र. ६३ / रोहयो -१, | दिनांक ०८ जानेवारी, २०१३ |
| ५ | केंद्र शासनाचे मास्टर सर्क्यूलर ( २०१६ -२०१७ ), | दिनांक ०१ एप्रिल, २०१६ |
| ६ | शासन निर्णय क्र. मग्रारो -२०१६ / प्र. क्र. १०२ / मग्रारो — १ | दिनांक २९ सप्टेंबर, २०१६ |
| ७ | शासन निर्णय क्र. मग्रारो -२०१६ / प्र. क्र. १०२ / मग्रारो — १ | दिनांक ३० जून, २०१८ |
| ८ | शासन निर्णय क्र. मग्रारो -२०१६ / प्र. क्र. १०२ (भाग-२)/ मग्रारो — १ | दिनांक २५ मार्च, २०१९ |

**प्रस्तावना :-**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत वन विभागामार्फत करण्यात येणाऱ्या वनीकरण व रोपवाटिकांच्या तसेच, मृद व जलसंधारणाच्या कामांसंबंधित तांत्रिक व प्रशासकीय मान्यतेचे अधिकार संदर्भाधीन दि.२९ सप्टेंबर, २०१६ च्या शासन निर्णयान्वये वन विभागास देण्यात आले होते. तसेच, सदर कामे घेत असतांना लेबर बजेटमध्ये कामे असल्याची खात्री करणे, ग्राम / तालुका/ जिल्हास्तरीय मंजूर आराखड्यात कामे असणे याकरिता प्रशासकीय मान्यतेपूर्वी पूर्ण कामांच्या यादीला मान्यता देण्याकरिता व शेल्फ तयार करण्याकरिता जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली छाननी समिती गठीत करण्यात आली आहे. सदर शासन निर्णय दि.३१ मार्च, २०१८ पर्यंतच अंमलात होत. सदर छाननी समितीस दि.३० जून, २०१८ च्या शासन निर्णयान्वये दि.३० सप्टेंबर, २०१८ पर्यंत मुदवाढ देण्यात आली होती. तद्नंतर दि.२५ मार्च, २०१९ च्या शासन निर्णय सदर छाननी समितीस दि.३१ मार्च, २०२० पर्यंत मुदतवाढ देण्यता आली. सद्यस्थितीत सदर छाननी समितीस मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यास अनुसरुन शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय :-**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत वन विभागामार्फत तयार करण्यात येणाऱ्या वनीकरण व रोपावटिकांची तसेच, मृद व जलसंधारणाची कामे घेत असताना लेबर बजेटमध्ये कामे



Scanned by CamScanner

असल्याची खात्री करणे, ग्राम / तालुका/ जिल्हा स्तरीय मंजूर आराखड्यात कामे असणे याकरिता प्रशासकीय मान्यतेपूर्वी पूर्ण कामांच्या यादीला मान्यता देण्याकरिता व शेल्फ तयार करण्याकरिता जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या छाननी समितीस दि.३१ मार्च, २०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

छाननी समितीने सन २०१८-१९ ते सन २०१९-२० पर्यंत मंजूर केलेल्या प्रकरणाबाबत शासन / आयुक्त (नरेगा) / विभागीय आयुक्त यांच्यामार्फत तपासणी करण्यात येईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्र.-----------------------असा आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

**(एकनाथ डवले)**
**सचिव (रोहयो)**

प्रत :-

१) मा. राज्यपालांचे सचिव
२) मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
३) मा.उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
४) सर्व मा. मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) मा. मुख्य सचिवांचे स्वीय सहायक
६) शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई
७) संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय
८) महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
९) महालेखापाल -१ (लेखा परीक्षा),महाराष्ट्र राज्य, मुंबई
१०) महालेखापाल-२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य, नागपूर
११) महालेखापाल-१ (लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई
१२) महालेखापाल-१ (लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, नागपूर
१३) सर्व विभागीय आयुक्त
१४) आयुक्त, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र, नागपूर
१५) सर्व जिल्हाधिकारी
१६) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१७) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर
१८) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर
१९) प्रधान मुख्य वनसंरक्षक (उत्पादन व व्यवस्थापन), महाराष्ट्र राज्य, नागपूर
२०) प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा महासंचालक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, नागपूर
२१) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र वन विकास महामंडळ, नागपूर
२२) सर्व अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक
२३) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई

Scanned by CamScanner